श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,व रुग्णालय,यवतमाळ.
SHRI.VASANTRAO NAIK GOVT.MEDICAL COLLAGE.YAVATMAL

---

जा.क्र. शावैमय / किरकोळ भांडार / महाविद्यालय / 22671 / 2022 दि. 5 / 12 / 2022

# उदळी / वाळवी प्रतिबंधक उपाययोजना करिता
# जाहिर दरपत्रक सुचना

श्री वंसतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयात करिता वेळोवेळी पेस्ट कंट्रोल करण्याकरिता त्यांचे दर एक वर्षाचा कालावधी करिता निश्चीत करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठाद्वारां कडुन दरपत्रक मागण्यिात येत आहे. सदर कालावधी दरनिश्चित पत्र निघाल्याच्या दिवसापासुन एक वर्षा करिता राहीन.

1) तांत्रीक लिफाफा ज्या लिफाफा मध्ये पुरवठादाराने दुकान नोदंनी प्रमाणपत्र, जिएसटी प्रमाणपत्र व पॅन कार्ड, शॉप एक्ट प्रमाणपत्र,पेस्ट कंट्रोल परवाना या कागदपत्राच्या छायाकिंत प्रती टाकुन तो मोहोरबंद करण्यात यावा त्यावर स्पष्ट शब्दात तांत्रीक बाबीचा लिफाफा असे नमुद करुन स्वतःचे नाव व पत्ता लिहावा व तो मोहोर बंद करावा
२) किमंतीचा लिफाफा - ज्यामध्ये दर नमुद असलेला कागद स्वाक्षरी व सहीनिशी टाकण्यात यावा व त्यावर स्पष्ट अक्षरात किमंतीचा लिफाफा नमुद करुन स्वतःचे नाव व पत्ता लिहावा व तो देखील मोहोर बंद करण्यात यावा.

उपरोक्त दोनही लिफाफे एका मोठया लिफाफया मध्ये टाकुण दरपत्रक अधिष्ठाता,श्री वंसतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ यांचे नावे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाफयावर रुग्णालया करिता आवश्यक असलेल्या उधळी/वाळवी प्रतीबंधक उपाययोजना करण्याकरिता दरपत्रक असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. स्वतःचे नाव व पत्ता लिहावा अशा प्रकारे तयार करण्यात आलेले दरपत्रक दि. ०८/१२/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यत कार्यालयात आणुन देण्यात यावे. तांत्रीक लिफाफा मध्ये दराचा उल्लेख करुन नये त्यामध्ये दर आढल्यास दरपत्रक अग्राह समजन्यात येईल.

प्राप्त होणा-या दरपत्रकातील तांत्रीक लिफाफे दि.०९/१२/२०२२ रोजी दु.१२.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उघडण्यात येईल.सर्व प्रथम तांत्रीक बाबीचे लिफाफे उघडण्यात येईल.अटी शर्ती नुसार सर्व कागदपत्रे योग्य आढळल्यास किमंतीचा लिफाफे उघडण्यात येईल.तांत्रीक बाबीची पुर्तता झाली नसल्यास संबंधीत पुरवठादाराचे दरपत्रक रद्य समजन्यात येईल.व त्याचे किमंतीचे लिफाफे उघडण्यात येणार नाही. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल.

जिथे दर द्यावयाचे नाही तिथे इच्छुक नाही असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यांत येवु नये. सर्व दर हे एक नगाकरिता सर्व कर समाविष्ट करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रक नाकारण्याचा अधिकार अधिष्ठांता यांनी राखुन ठेवलेला आहे.तसेच यादी मधील काही बाबी किंवा मागविण्यांत येणा-या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे.

दर हे पेनने लिहीन्यात येऊ नये ते प्रिंट केलेले असावे. हस्ताक्षरात लिहिलेले दरपत्रक रद्य करण्यात येईल. दर निश्चिती झाल्यावर आवश्यकते बाब निहाय न्युनतम दर देणा-या

पुरवठाद्वाराचे नाव दर निश्चिती करण्यात येईल. आवश्यकते नुसार वेळोवेळी आदेश काढण्यात येईल. आदेश प्राप्त होताच तिन दिवसामध्ये पेस्ट कंट्रोलचे कामकाज करावा लागेल. व त्यांचे देयक तिन प्रतीत मा.अधिश्ठाता, श्री.व.ना.शा.वै.महा. व रुग्णालय, यवतमाळ. यांचे नावाने देयक सादर करावे. सदर फवारणीचा कालावधी एक वर्षाचा राहीन फवारणी केल्या नतंर एक महीण्यात आत 50 टक्के देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.जर देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाला तर त्यावर कोणात्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही. उर्वरीत 50 टक्के रक्कम फवारणी केल्याच्या तारीखे पासुन 6 महीण्या नतंर सबंधीत विभागाने सदर फवारणी उपयुक्त ठरल्याचे प्रमाणीत करुन दिल्यावर देण्यात येईल.

सदर दरपत्रका सबंधी आपणास काही तक्रार या कार्यालयास दाखल करावयाची असल्यास प्रथम आपल्या या कार्यायात तक्रार सबंधी रु.१०,०००/- शासन खाती जमा करावे लागेल.जर आपण दाखल केलेल्या तक्रारीत या कार्यालयास काही तथ्य आढलुन आल्यास आपणास आपण शासनखाती जमा केलेली रु.१०,०००/-रक्कम परत करण्यात येईल. तक्रारीमध्ये काही तथ्य न आढल्यास रु.१०,०००/- रक्कम परत करता येणार नाही व ती रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

तसेच त्याबाबतचे दरपत्रके मागवुन कार्यवाही करण्यात आली होती.जाहीरात क्र.२१६००/२२ दिनांक २३/११/२०22 नुसार तिन पुरवठाद्वाराचे दरपत्रके सादर करण्यात आले होते. त्यामधील मे.पॅरागान पेस्ट कंट्रोल यवतमाळ यांचे तांत्रीक लिफाफे समिती समोर उघडल्या नतंर त्याच्या मध्ये जीएसटी प्रमाणपत्र आढळुन आले नाही करिता वरिल पुरवठाद्वाराचे दरपत्रक रदद करुन पुन.चछ दरपत्रक मागविण्ययात येत आहे.

| अ.क्र. | वस्तुंचे नाव | प्रती स्केअर फुट | दर |
|---|---|---|---|
| ०१ | उधळी/वाळवी प्रतीबंधक उपाययोजना | प्रती स्केअर फुट | |
| ०२ | उंदीर/घुस प्रतीबंधक उपाययोजना | प्रती स्केअर फुट | |
| | | | |

अधिष्ठाता
श्री वसंताराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व
रुग्णालय यवतमाळ